REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# संत साहित्य आणि समाज प्रबोधन

**डॉ. जनार्धन परकाळे**
**सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज**
**ता. माळशिरस जि. सोलापूर.**

## प्रास्ताविक :-



महाराष्ट्रात आणि या देशातील अनेक प्रांतात १२ व्या शतकात अनेक जाती धर्माच्या साधुसंतांची व वारकरी संप्रदायाची परंपरा निर्माण झाली. वारकरी संप्रदायामध्ये १२ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत अनेक संत मंडळींनी आपल्या साहित्यातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. समाजाला योग्य दिशा देणे, वाट चुकलेल्यांना योग्य मार्गदर्शन करणे, चांगले व वाईट शत्रू-मित्र ओळखण्यास शिकविणे, अंध: श्रध्दा, अनिष्ठ रुढी, परंपरा, देव धर्म, भोळेपणा सोडून विज्ञानवादी दृष्टिकोन स्विकारण्यास भाग पाडले, भविष्याकाळाची उज्वल स्वप्ने दाखविण्याचे महान कार्य संतांनी केले आहे. त्यांना दीनदुबळया समाजाबद्दल तळमळ वाटते. ते भेदभाव कधीच करीत नाहीत, ते समाजाला समानतेची, त्यागाची, बंधूभावाची, एकतेची शिकवण देतात. त्याचा देह समाज प्रबोधनासाठी सतत झिजत असतो. समाजाच्या भल्यासाठी त्यागाची अपेक्षा करतात. पाप-पुण्य, जन्म-मृत्यु, अंध:श्रध्दा यात खितपत न पडण्याची शिकवण देतात. अशा वारकरी संप्रदायात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार, संत कर्ममेळा, संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा, संत निठोबा, संत रामदास, संत बहीणाबाई इत्यादी संत मंडळींनी समाज उद्धारासाठी व समाज प्रबोधनासाठी आपल्या साहित्यातून मौलिक विचारधन दिले आहे. त्यांनी आपल्या अभंगातून व साहित्यातून हिंदू धर्मातील समाजव्यवस्थेत चालत असलेला दैववाद, अध:श्रध्दा, अज्ञान, कर्मकांड या गोष्टीवर प्रहार करुन समाज प्रबोधन केले आहे.

समुद्रात दगड मारल्यानंतर काही काळ पाण्यावर लाटा उमटतात आणि थोडया वेळाने पाण्यासह विरुन जातात. तसाच हा प्रकार झाला आहे. समाजाच्या मनावर देवाधर्माचा आणि अंध:श्रध्देचा फार मोठा पगडा असतो. हिंदू समाज गेली अनेक वर्षे रुढी-परंपरा-अंध:श्रध्दा आणि मानसिक गुलामगिरीत अडकून पडलेला आहे. तो मुक्त करण्यासाठी संतांनी आपल्या अभंग रचनेतून प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्रातील संत साहित्या आणि संताच्या कार्याचा परामर्श अनेक अभ्यासकांनी आपआपल्या परीने घेतला आहे. संत साहित्याकडे सामाजिक भूमीकेतून पाहण्याच्या पध्दतीचा पाया न्यायमूर्ती रानडे यांनी घातला. स्वतःवर पाश्चिमात्य विचारसरणीचा प्रभाव असूनही रानडे यांनी संत चळवळीकडे समन्वयवादी, विधायक भूमिकेतून पाहिले. सर्वांनी निखळ धर्म निरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टिकोन व इहवादी भूमिकेचा अवलंब करुन समाजचिंतकांनी काळाचे भान राखले पाहिजे. समाजवाद व धर्मनिरपेक्षता ही तत्त्वे गंभीरपणे स्वीकारली पाहिजे. १९७३ च्या कराड येथील यशवंतराव चव्हाण व्याखानमालेत, गं. बा. सरदार म्हणातात, ‘‘धर्माच्या व राष्ट्रनिष्ठेचा काही संबंध नाही. पाचपन्नास स्वार्थी माथेफिरु लोकांसाठी सगळया समाजाला राष्ट्रद्रोही समजणे योग्य नाही. आधुनिक काळात धर्म हा राष्ट्राचे अधिष्ठान होऊ शकत नाही, असे गांधी व नेहरु म्हणत असत. आपल्यापैकी पुष्कळांना ते विचार पटले नाहीत. पण एकाच धर्माचे लोकही एकमेंकावर अनन्वित अत्याचार करु शकतात. कोणत्याही समाजात देशाला विघातक अशा काही प्रवृत्ती असतील तर त्या ठेचून काढाव्याच लागतील. उगीच इतिहासातील पुर्व ग्रह उगाळीत बसून आपण आजचे प्रश्न बिकट करुन नयेत.’’ ‘‘अशी धर्म विषयक परिवर्तनवादी भूमिका सरदारांनी आपल्या लेखनातून सतत मांडली आहे. संत कालिन महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय विवेचन कराताना गं. बा. सरदार लिहतात, ‘‘भौतिक दुरावस्था व मानसिक गुलामगिरी यामुळे सामान्य जतना जडमुख व आगतिक बनलेली होती. या केविलवाण्या स्थितीतून तिला मुक्त करण्यासाठी संत चळवळ जन्माला आली. या चळवळीचे कार्यक्षेत्र बऱ्याच अशी धार्मिक व सांस्कृतिक होते. सामाजिक जीवनातील मुलभुत प्रश्नांला हात घातला नाही. शास्त्रप्रामाण्यांना व जाती व्यवस्थेला धक्का न लावता वारकरी पंथाने स्त्रीशुद्रादिकांना आत्मविकासाचा मार्ग खुला करुन दिला. पुर्व कर्मानुसार प्राप्त झालेल्या बाहय परिस्थितीत आपणास यात्किंचीतही बदल करता आला नाही. तरी हताश होण्याचे कारण नाही. कोणत्याही जातीच्या मणुष्याला भक्तीपंथाच्याद्वारा आध्यात्मिक उन्नती साधता येईल. नैतिक सामर्थ्य वाढविता येईल. प्रापंचिक दु:खावर मात करता येईल असा या चळवळीने विश्वास निर्माण केला.’’ असा विश्वास निर्माण झाल्यामुळे समाजाच्या सर्व जातीतून अनेक संत उदयाला आले. अस्पृश्य

जातीतूनही संत निर्माण झाले. त्यांनी आपल्या अभंगातून सामाजिक विषमतेची मांडणी करुन आपल्या मनातील जाती भावनेचा, जाती अपमानाचा स्पष्ट उल्लेख करुन समाजात समता प्रस्तावित व्हावी यासाठी आपल्या साहित्यातून प्रबोधनाची भूमिका घेतली. शिवाय त्यांनी आत्मप्रकटीकरणाबरोबर सामाजिक जीवनातील शल्ये अभंगातून चित्रीत केली आहेत. सामाजिक विषमतेचा निषेदही करतात. क्वचित बंडखोरीची भाषा बोलतात व पुन्हा निमुटपणे मान खाली घालून जीवन जगताना दिसतात.

मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात अनेक संतांनी अस्पृश्यता, माणसातील भेदभाव, उच्चनीचता यावर आपल्या अभंगातून आवाज उठविला आहे. त्यांनी देव, धर्म, वर्ण, कर्मकांड, अंध:श्रध्दा, जातीयता, विषमता या बद्दल विद्रोह व नापसंती व्यक्त केली आहे. संत ज्ञानेश्वर आपल्या एका ओवीत दगडाच्या देवाबद्दल म्हणतात.

“देव ते कल्पित शास्त्रे ती शाब्दिक
पुराणे सकळीक बाष्कळीक
पाषणाचा देव बोलेचिना कधी
हरी भवा न्याधी केली ही ”

संत चोखामेळा : आपल्या अभंगात म्हणतात,

१) “हीन याती माझी देवा, कैशी घडावी तुझी सेवा
जोहार मायबाप जोहार, मी संता घरचा महार ll”
२) “ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा
काय भुललासी वरलिया रंगा ll”

संत कर्ममेळा म्हणतात, “आमुचि केली हीन याती l तुज का न कळे श्रीपती l जन्म गेला उष्टे खाता l लाज न ये तुमच्या चित्ता ll”

संत सोयराबाई आपल्या अभंगात म्हणातात, “देहिचा विटाळ देहिच जन्माला l सोवळा तो झाला कवणा धर्म? ll विटाळावाचोणी उत्पत्तीचे स्थान l कोण देह निर्मळ नाही झाला ll”

संत तुकारामांनी तर आपल्या वेगवेगळया अभंगातून समाज प्रबोधनाची दिशाच दिली आहे. ते म्हणतात,

१) “वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा ll येरांनी वाहावा भार माथी ll”
२) “मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास l कठीण वज्रास भेदू ऐसे ll
भले तरी देऊ कासेची लंगोटी l नाठाळाचे माथी हाणु काठी ll”

अशा प्रकारे संतांच्या तत्वज्ञानामुळे व अभंगामुळे लोकांचे प्रबोधन झाले आहे. लोकांच्या मनाचे थोडेसे बाह्य परिवर्तन झाले परंतु मानसिक परिवर्तन झाले नाही. संतांच्या शिकविणीमुळे आध्यमिक समता निर्माण झाली पण समाजात धार्मिक, सामाजिक, आर्थिक, मानसिक व सांस्कृतिक समता निर्माण झाली नाही. हे नाकारता येत नाही. संतांनी सामाजिक समतेसाठी प्रखर संघर्ष केलेला दिसत नाही. मात्र काही अंशी समाज परिवर्तनासाठी हातभार लावण्याचे प्रयत्न त्यांच्या साहित्यातून दिसून येते.

संत ज्ञानेश्वर-एकनाथांच्या अभंगातून समाज प्रबोधनाची व परिवर्तनाची भूमिका सहानुभुतीची होती मात्र संत चोखामेळा व त्यांचे कुटुंबीय व संत तुकाराम यांची भूमिका जिव्हाळ्याची व तळमळीची होती. संत चोखामेळा यांनी आपल्या अभंगातून जातीय उच्च-नीचता व वाट्याला येणारी अवहेलना व हेटाळणी मांडली आहे. तर संत कर्ममेळयांची मांडणी माणुसकीसाठी बंडखोरीची भाषा आहे. महाराष्ट्रातील संत संप्रदाय हा केवळ भागवत धर्माचे प्रवक्ते म्हणून कार्य करीत नव्हता तर तत्कालीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पुनर्मांडणीच्या कामात व्यस्त होता. या सामाजिक सुधारणेत संत मंडळीची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे सामाजिक व्यवहारात कटूता कमी झाली.

संत तुकाराम हे बहूजन वर्गसमुहाचे प्रतिनिधीत्व करणारे विद्रोही संत होते. संत तुकारामांनी आपल्या एकूण अभंग वाङ्मयातून बहूजनांच्या बौध्दिक कुचंबणेची कोंडी फोडण्याचा अटोकाट प्रयत्न केला आहे. पुरोहीत वर्गाकडे बहूजन वर्गसमुहाच्या पिळवणुकीला पुरक अशी आर्थिक आणि धार्मिक वर्चस्वाची सबळता होती. त्या वर्गातील धर्मभोळेपणा व बौध्दिक गुमालगिरी हाच मुख्य आधार पुरोहिताकडे होता. ग्रामसंस्थेत पुरोहित महत्वाचा होता. तो धर्मशास्त्र, कर्मवाद व जन्मसिध्द जातीप्रथा यामुळे व्यक्तीविकासाला वाव मिळू देत नव्हता. अशा धर्म संस्थानिक व पुरोहितांचा संत तुकाराम यांनी मनस्वी घृणा केली. धर्मशास्त्र व जातीप्रथा यातून पुरोहित वर्गाच्या जाचकतेचा अनुभव संतांना आला. तेव्हा अनेक संतांनी आपल्या अभंगातून सतत टिकेची झोड उठवली. महाराष्ट्रातील संत मंडळींनी इथल्या बहूजन वर्ग समुहाला जागृत करुन पुरोहित वर्गाच्या दांभिकतेवर अकुंश ठेवण्याचे महान कार्य केले. महाराष्ट्रातील संतांनी समाज परिवर्तन करुन समाज प्रबोधनही केले आहे. कालबाह्य व्यवस्थेला विरोध करुन नव्या समाज निर्मितीसाठी काम केले. बहूजन वर्गसमुहातील अज्ञान दूर केल्याखेरीज कोणतीही समाज परिवर्तनाची चळवळ यशस्वी होऊ शकत नाही. सर्व संतांनी सामाजिक बदलसाठी ज्ञानाचे व त्याच्या प्रसाराचे महत्त्वाचे काम केले. संत

एकनाथांनी आपल्या अभंग व साहित्यातून भोंदूगिरीवर चांगलाच प्रहार केला आहे. ते म्हणातात, "अंगा लावूनिया राख l करी भलतेच पाप l मेळवी शिष्यांचा मेळा l अवघा भांगेचा घोटाळा ll"

संतांचे समग्र सामाजिक स्थान वर्णविशिष्ठतेमुळे फारच उपेक्षित राहिले. संतांनी वाङमयातून सदगुणांचे संवर्धन आणि दुर्गुणाचा त्याग करण्याची विचारदृष्टी दिसते. संतांच्या अभंगातून आध्यत्मिक प्रबोधनाचा विचार केला आहे. संत साहित्याने सामाजिक आणि आध्यत्मिक समता, मानवता, सदगुण व सदाचार याची शिकवण दिली.

महाराष्ट्रातील संतांनी विषमता अमान्य करुन सामाजिक व पारमार्थिक संदर्भात समाजातील सर्व थरातील लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे विविध जाती जमातील लोक या समन्वयवादी संप्रदायांच्या धर्माच्या छत्राखाली एकत्र आले. त्यांनी त्यांचे जीवनव्यवहार, व्यवसाय आणि आर्थिक व्यवहार याचं चित्र त्यांनी आपल्या अभंग व साहित्यातून मांडले आहे. संत नामदेव यांनी व्यवसायातून विठ्ठल भेटीची ओठ चित्रीत केली आहे.

"शिंपीयाचे कुळी जन्म माझा जाला l
परि हेतु गुंतला सदाशिवी ll
रात्रीमाजी सिवी दिवसामाजी सिवी l
अराणूक जीवी नोव्हे कदा ll"

संत सावता माळी यांनी आपला माळयाचा व्यवसाय करता-करता प्रपंच हा परमार्थरुपी केला आहे.

"आमुची माळियाची जात l शेत लावू बागाईत ll
आम्हां हाती मोट-नाडा l पाणी जाते फुल झाडा ll
शांती शेवंती फुलली l प्रेम जाई-जुई व्याली ll
सावतांने केला मळा l विठ्ठल देखियला डोळा ll"

अशा प्रकारे संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत कर्ममेळा, संत बंका, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा इत्यादी संतांनी आपल्याला समाजात कसे हिनतेने वागविले जाते याचे चित्रत वेगवेगळया अभंगातून केले आहे. संत हे लौकीक जीवन जगत असल्याने या जीवनाचे विविध पडसाद त्यांच्या लेखनातून सतत उमटले आहे. विविध व्यवसाय, उद्योग, आर्थिक व्यवहार यांचे उल्लेख येणे अपरीहार्य आहे. अशा लेखन मांडणीतून तत्कालीन समाजाची जाणीव जागृत करुन समाज प्रबोधनाची एक दिशाच त्यांनी दिली. महाराष्ट्रातील संतांनी धर्मातील कर्मकांड, सोवळं-ओवळं, वर्णवर्चस्व, सामाजिक विषमता या विषयी चीड व्यक्त केली आहे. यातून बहूजन वर्गाने बाहेर आले पाहिजे असा संदेश दिला.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) गं. बा. सरदार यांचे मत, (संपा.) चौगुले वि. शं. : संत, समाज आणि अध्यात्म मधुरा प्रकाशन ठाणे, २००६ - (प्र. आ)
२) गं. बा. सरदार - संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती : एक ओळख श्रीविद्या प्रकाशन, पुणे - १९८२ (प्र. आ.)
३) डॉ. यु. म. पठाण - मध्ययुगीन मराठी संतसाहित्य : काही आयाम स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २००३ (प्र. आ.)
४) र. रा. गोसावी - पाच भक्तिसंप्रदाय प्रतिमा प्रकाशन, पुणे (तृ आ.) १५ ऑगस्ट २००८.
५) सुगावा (नियतकालिक) - डिसेंबर २००५.
६) ल. रा. नसिराबादकर - प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास फडके प्रकाशन, कोल्हापूर, जुलै २००८.
७) अंधःश्रध्दा निर्मूलन वार्तापत्र (मासिक) मार्च २०१२.